स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

जा.क्र.:कबचौउमवि/१६/ईमेल/२०२३ दिनांक :-६ जून, २०२३

जळगाव दि. ६ (प्रतिनिधी) शिवराज्याभिषेक दिनानिमित्त कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात मंगळवार दि.६ जून रोजी सकाळी उत्साहात शिवज्योत रॅली काढण्यात आली.

या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विद्यार्थी विकास विभाग, विचारधारा प्रशाळा, श्री.छत्रपती शिवाजी महाराज अभ्यास व संशोधन केंद्र व सामाजिकशास्त्रे प्रशाळा यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले. कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवज्योत रॅलीची सुरुवात विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशव्दारापासून झाली. प्रशासकीय भवनाजवळ रॅलीचे विसर्जन झाले. तदनंतर श्री. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळयाच्या प्रतीमेचे पूजन करण्यात आले. बेंडाळे महिला महाविद्यालयाची विद्यार्थिनी दिप्ती पाटील हिने खडया आवाजात शिवाजी महाराजांच्या जीवनावरील पोवाडा सादर केला. संगीत साथ संगत जयेश साळुंके या विद्यार्थ्यांने दिली. रॅलीत प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील, सहसंचालक संतोष चव्हाण, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक प्रा.दीपक दलाल, छत्रपती शिवाजी महाराज अभ्यास व संशोधन केंद्राचे प्रभारी प्रमुख प्रा.अजय पाटील, संचालक प्रा.ए.एम.महाजन, रासेयो संचालक प्रा.सचिन नांद्रे, डॉ.राजेश जवळेकर, डॉ.संजय शिंगाणे, डॉ.नितीन बडगुजर, डॉ.उमशे गोगडीया, डॉ.मनोज इंगोले, डॉ.शीला राजपूत, डॉ.विजय घोरपडे, विलास पाटील, सविता सोनकांबळे, डॉ.नीता पाटील, डॉ.कविता पाटील, अरुण सपकाळे, कैलास औटी, शिवाजी पाटील, चंद्रकांत पाटील यांच्यासह रासेयो स्वयंसेवक व विद्यार्थी यांनी उपस्थित होते.

**बातमी क्र.२**

जळगाव दि. ६ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील बी.टेक. (पेंट व प्लास्टीक टेक्नॉलॉजी) च्या तीन विद्यार्थ्यांची बर्जर पेंटस, सिंगापूर या नामांकित कंपनीत निवड झाली असून त्यांना वार्षिक २१ लाख रुपयांचे पॅकेज प्राप्त झाले आहे.

केंद्रिय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत विद्यापीठातील विद्यापीठीय रसायन तंत्रज्ञान संस्थेत या मुलाखतींचे आयोजन करण्यात आले होते. २३ विद्यार्थी या परिसर मुलाखतीसाठी उपस्थित होते. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी शरद माळी व मनुष्यबळ विभागाच्या अंशूकुमारी यांनी मुलाखती घेतल्या. यामध्ये पेंट टेक्नॉलॉजीचे हेमांगी शेळके व विपुल पाटील आणि प्लास्टीक टेक्नॉलॉजीचा विद्यार्थी निखील मोरखेडे या तिघांची निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांना वार्षिक वेतन २१ लाख इतके दिले जाणार आहे. कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. संचालक प्रा.जे.बी.नाईक, समन्वयक प्रा. रमेश सरदार, उपसमन्वयक डॉ.

उज्वल पाटील, डॉ.जितेंद्र नारखेडे, डॉ.रवींद्र पुरी व प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा यांनी मुलाखतीचे व्यवस्थापन केले.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी